Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक ८] मंगळवार, मार्च २८, २०२३/चैत्र ७, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४.

**मुख्याधिकारी नगर परिषद, यांजकडून**

**मोर्शी शहराच्या प्रारुप विकास योजनेमधील बदलांच्या सूचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) अन्वये प्रसिद्धीकरण**

**सूचना**

क्रमांक नपमो-जाक्र-नर-१०५५-२०२३.—

ज्याअर्थी, मोर्शी नगर परिषद, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) नुसार प्रारूप विकास योजना (मुळ हद्द), मोर्शी दिनांक ४ ऑक्टोबर, २०२२ चे सूचनेद्वारे नागरिकांच्या सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात अमरावती विभागीय पुरवणी, भाग १-अ मध्ये दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी प्रसिद्ध झाली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहीत मुदतीत कार्यालयास हरकती/सूचना प्राप्त झालेल्या नाही. त्यामुळे उक्त अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये नियोजन समिती गठित करण्यात आलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, हरकती व सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. परंतु, उक्त अधिनियमाचे कलम २८(४) नुसार मा. प्रशासक यांनी दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ चे आदेश क्र. १ नुसार उक्त विकास योजनेत बदल करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी ठराव पारित केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८(४) खालील तरतूदीनुसार उक्त योजनेच्या मसूद्यात केलेले बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध करणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी, उक्त विकास योजनेच्या मसुद्यात नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८(४) नुसार केलेल्या बदलांची सुची नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर बदल दर्शविणारा उक्त प्रारूप विकास योजनेचा नकाशा खालील नमूद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधीकरीता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

**परिशिष्ट-अ**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २८(४) नुसार केलेल्या फेरबदल/बदलांची सूची**

| क्रमांक | फेरबदल/बदलांचा तपशील |
|---|---|
| (१) | (२) |
| एम १ | दमयंती नदीचे लगत ग्रीन बेल्ट (Green Belt) क्षेत्रात नदी सौंदर्यीकरण करिता जागा आरक्षित करण्यात यावी.<br>**(नियोजन प्राधिकरणाने सूचविलेले बदल)** |
| एम २ | दमयंती नदीच्या पूर्वेकडील भाग, मौजे मोर्शी, सर्वे क्र. २२४ मध्ये नवीन आरक्षण क्र. १२ “S.T.P. (Sewage Treatment Plant) प्रस्तावित करण्यात यावे.<br>**(नियोजन प्राधिकरणाने सूचविलेले बदल)** |

(१) मुख्याधिकारी, नगर परिषद, मोर्शी.

(२) सहायक संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, शाखा अमरावती.

**गिता ठाकरे,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मोर्शी.

मोर्शी :
दिनांक २७ मार्च, २०२३.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Publication of list of Changes in Draft Development Plan of Morshi (Origninal limit) under Section 28(*4*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

*NOTICE*

No. MCM-Outward-No.-TP-1055-2023.—

Whereas, Morshi Municipal Council, Distt. Amravati being Planning Authority has published the Draft Development Plan of Morshi (Original Limit) u/s 26(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, *vide* notice dated 4th October, 2022 for inviting suggestions/objections from public. The said Notice is published in Maharashtra Government Gazette of Amravati Division, Supplement Part 1-A, dated 6th October, 2022.

And whereas, there is no suggestions/objections in stipulated period, therefore Planning Committee is not constituted under Section 28(*2*) of the said Act ;

And whereas, there is no suggestion/objections in stipulted period, Resp. Administrator has passed Resolution No. 01, dated 21st February 2023 to make changes to the said Plan and to submit the said Plan for sanction to the Government u/s 30 of the said Act ;

And whereas, it is necessary to publish the said changes made in the said Plan for inspection of the public as per Section 28(*4*) of the said Act ;

Now therefore, the list of changes made u/s 28(*4*) of the Act, by the said Planning Authority is hereby published as per the provisions of the said Act for information of the public. The said Draft Development Plan showing the changes is kept open for the inspection of the public in the following offices, on working days, during office hours for a period of 30 days.

*APPENDIX*—A

**List of Modification made Under Section 28(*4*) of MR&TP Act, 1966.**

| Modification No. | Details of Modifications/Changes |
|---|---|
| (1) | (2) |
| M 1 | Damayanti River said Green Belt is to be reserved for river beautification purpose. **(Modification Suggested by Planning Authority).** |
| M 2 | New Site No. 12 “Sewage Treatment Plant” is to be proposed on the eastern side of Damayanti River in S. No. 224 pt. Mouje Morshi as shown on plan. **(Modification Suggested by Planning Authority).** |

(1) Chief Officer, Morshi Municipal Council.

(2) Assistant Director, Town Planning Branch, Amravati.

GEETA THAKARE,
Chief Officer,
Municipal Council, Morshi.

Morshi :
Dated the 27th March, 2023.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.